आरोग्य सेवा सुलभ आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना करा >>पान 2

तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ >>पान 3

बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांना स्वयंरोजगाराचे धडे: बंद्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद >>पान 4

**सुविचार**
नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 129 ■ शुक्रवार, दि. 20 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




प्रिती झिंटाची कार्बन कॉपी आहे 'ही' टॅलेंट अभिनेत्री, डिंपलवर सगळेच फिदा!
आतील पान

# तुमच्या देशभक्तीवर शंका नाही, पण विरोधकांच्या खांद्यावर कोणीतरी बंदूक ठेवतंय

## 'मालेगाव व्होट जिहाद'वरून फडणवीसांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : मालेगाव येथील मर्चंट बँकेच्या शाखेत बेरोजगार तरुणांच्या खात्यांवरून १०० कोटी रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. हे पैसे विधानसभा निवडणुकीत 'व्होट जिहाद'साठी वापरल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. आता या प्रकरणावरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केलाय.**

विधानसभेतील भाषणात देवेंद्र फडणवीस म्हणाले की, निवडणूक जिंकण्यासाठी यांनी काय काय केले नाही? आम्ही महाराष्ट्रात पहिल्यांदा बघितले की कोणीतरी येतात आणि व्होट जिहादचा नारा देतात, १७ मागण्या तुमच्याकडे केल्या जातात आणि तुमचे तोंडच उघडत नाही. यातले खरे षड्यंत्र नाना भाऊ मी तुम्हाला सांगतो. माझा तुमच्यावर विश्वास आहे, तुमचा अविश्वास नाही, मात्र तुम्ही कुठेतरी भटकलेले आहात.

मालेगावमध्ये काही युवकांनी २०२४ मध्ये पोलिसात तक्रार केली. ११४ कोटी रुपयांची बेमानी रोख रक्कम खात्यांमध्ये आलेली आहे. आरोपी सिराज मोहम्मदने १४ लोकांचे पॅनकार्ड आणि आधारकार्ड वापरून नाशिक मर्चंट बँकेत उघडली. या १४ खात्यांमध्ये ११४ कोटी रुपये जमा झाले. नंतर ते पैसे सिराज मोहम्मद आणि २१ लोकांच्या खात्यात वळते झाले. पोलीस, ईडी आणि आयकर विभागाने याची चौकशी केली असता यात २१ राज्यातून २०१ बँक खात्यात हजार कोटी रुपयांचा व्यवहार झालाय. मुंबई, नाशिकसह वेगवेगळ्या शहरात हे पैसे गेले आहेत. ६०० कोटी रुपये दुबईला पाठवण्यात आले आणि १०० कोटी रुपये या निवडणुकीच्या काळात वेगवेगळ्या गोष्टींसाठी वापरण्यात आले. आता तर एटीएसकडे हा तपास गेलेला आहे. मात्र, निवडणुका जिंकण्याकरता आपण कुठल्या स्तराला जात आहोत. देशाच्या निवडणुकींमध्ये परकीय हस्तक्षेपाचे पुरावे देशाच्या संसदेत आले आहेत.



आपण सगळे एकमेकांच्या विचारांचे विरोधक आहेत. तुमच्या देशभक्तीवर माझी शंका नाही. पण दुर्दैवाने आमचे विरोधक आपला खांदा कुणाला तरी बंदूक ठेवायला देताय, याचे मला दुख: आहे. आपल्या खांद्यावर कोण बंदूक ठेवतंय याचा देखील विचार केला पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर देखील निशाणा साधला. त्यांनी म्हटलंय की, शरद पवार साहेबांनी कधीही इव्हीएमचा मुद्दा काढला नाही. ऋमात्र, यावेळी त्यांनी ईव्हीएमचा मुद्दा काढला. ऋते म्हणाले की, छोटे राज्य आम्हाला देतात आणि मोठे ते घेतात. पवार साहेबांचं मला नवल वाटलं. पवारांनी कधीही ईव्हीएमबद्दल टिप्पणी केली नाही. पण यावेळी तेही बोललेत. आता तर ओमर अब्दुल्ला आणि ममता बॅनर्जी यांनी म्हटलंय की, ईव्हीएमवर बोलू नका. लोकांना तुम्ही जाऊन धमकावता. ऋराष्ट्रवादी शरद पवार गटाला मत मिळाले पाहिजे, म्हटले जाते. लोकशाहीत ही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

## नायलॉन मांजाने चिमुकल्याचा कापला कान, येवल्यात नायलॉन मांजाचा सर्रास वापर



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नायलॉन मांजावर बंदी असून देखील येवला शहरात सर्रासपणे नायलॉन मांजाचा वापर होत असून शहरातील फत्तेबुरुज नाका येथे आई आपल्या मुलाला दुचाकीवरून घेऊन जात असताना मांजा या मुलाच्या डोक्यात अटकल्याने यात त्याचा कान कापला गेल्याची घटना घडली आहे.तरी त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले असता बारा टाके पडले असल्याची माहिती डॉक्टर स्वप्निल शहा दिली आहे. तरी नायलॉन मांजावर कधी बंदी आणणार असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

## अंबड येथील मुलीच्या आत्महत्या प्रकरणी आरोपीचे आई-वडील फरार; दोन पथक शोध घेण्यासाठी रवाना



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यातील अंबड शहरात मागील ८ दिवसांपूर्वी ११वी मध्ये शिकणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीने तरुणाच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. यानंतर जिल्हाभरात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात आधीच जेलमध्ये असलेला आरोपी सोहम मिंदर याने अनेक मुलींची फसवणूक केल्याचे पोलीस तपासात उघड झालं आहे. दोन मुलींचे जबाब पोलिसांनी नोंदवले असून आणखी काही मुलींचे जबाब नोंदवण्याचे प्रयत्न पोलीस प्रशासन करणार आहे. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल लॅपटॉप यासह इतर काही वस्तू जप्त केल्या असून त्याचा डेटा रिकव्हर करण्यासाठी छत्रपती संभाजी नगरला पाठवला आहे. दरम्यान या प्रकरणातील मुख्य आरोपीची आई वडील गेल्या ६ ते ७ दिवसापासून फरार असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांची स्वतंत्र दोन पथके रवाना झाली असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी दिली आहे. शिवाय या प्रकरणाची कसून चौकशी सुरू आहे.

## कृषी पंपासाठी २४ तास वीजपुरवठा देण्यासाठी शेतकऱ्यांचे जल समाधी आंदोलन

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील शेतकरी २४ तास वीजपुरवठा देण्याच्या मागणीसाठी आक्रमक झाले आहेत. ईसापूर धरणातील पाणी नांदेडच्या उमरी तालुक्यातील हिरडगाव परिसरात येते. हिरडगाव येथे शेकडो शेतकऱ्यांना हे पाणी कॉनल द्वारे येत असते. परंतु हे पाणी शेती पिकांना देण्यासाठी वीज पुरवठा नाही आहे. पाण्याअभावी शेकडो हेक्टर वरील ऊस यासह इतर पिके करपून जात आहेत. त्यामुळे पाणी पातळी कालावधीत कृषी पंपासाठी २४ तास वीजपुरवठा देण्यात यावा या मागणीसाठी हिरडगाव येथील शेकडो शेतकऱ्यांनी जल समाधी आंदोलन केले आहे. ईसापूर धरणातून फक्त एक आठवड्यासाठी पाणी येते त्यात ८ तास वीजपुरवठा केला जातो पण त्यातील २ तास वीजपुरवठा खंडीत केला जातो त्यामुळे शेती पीकांना पाणी देणे कठीण होते त्यामुळे २४ तास वीजपुरवठा द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



## कर्नाटक सरकारकडून अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा घाट, पश्चिम महाराष्ट्राच्या पोटात गोळा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कर्नाटक सरकार अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या निर्णय घेतल्याने पश्चिम महाराष्ट्राच्या पोटात गोळा आला आहे. बेळगावमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात अलमट्टी धरणाची उंची ५२४.२६ मीटर पर्यत वाढवण्याचा निर्णय कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घेतला आहे. कृष्णाकाठ योजनेतील तिसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण करण्यासाठी सव्वा लाख एकर भूसंपादन, पुनर्वसन याला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे महापुराच्या गर्ते त सापडलेल्या पश्चिम महाराष्ट्रावर दुरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. करवीरचे आमदार चंद्रदीप नरके यांनी कर्नाटक सरकारच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली आहे. अलमट्टी धरणाची पाणी पातळी सध्या ५१९.६० मीटर आहे.

दरम्यान, कर्नाटक विधानसभेत उत्तर कर्नाटकावर झालेल्या चर्चे प्रसंगी आमदार बसवराज पाटील-यत्नाळ यांनी अलमट्टी धरणाच्या पाणी सिंचनाचा मुद्दा उपस्थित केला. आपल्या भागात अलमट्टी धरणातून पाणी सिंचन झाले पाहिजे तसे झाले तरच आमचा जगू शेतकरी जगू शकेल,असे नमूद केले.



दरम्यान, कर्नाटक सरकारच्या निर्णयावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, धरणाची उंची वाढवली वर त्यांचे नियोजन कसे करायचे यांचे नियोजन करण्याची यंत्रणा आहे. म हाराष्ट्र व कर्नाटकच्या अधिकाऱ्यांनी चर्चा करूनच अलमटी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पूर परिस्थीत देखील त्यांचा समन्वय असतो. मात्र, आता उंची किती वाढणार व पाणी मागे किती येणार याची मॉडेलिंग तयार करण्याची गरज आहे. त्यांचा पश्चिम महाराष्ट्रावर किती परिणाम होईल हे आता सांगता येणार नाही.

दुसरीकडे अलमट्टी धरणात सांगली, कोल्हापूर महापुराचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त केलेल्या मुकुंद घारे समितीने अलमट्टी धरणातील पाणीसाठ्याचा उल्लेख केला आहे. या धरणात ऑगस्टअखेर ५१९.६४ मीटर पाणीपातळी ठेवण्याची मर्यादा निश्चित केली आहे. या मर्यादेचे उल्लंघन झाल्याने २००५ मध्ये सांगली आणि कोल्हापुरातील महापूर स्थिती भीषण झाल्याचे अहवालात म्हटले आहे.

## संघाची भूमिका बाळासाहेब ठाकरेंसारखीच आक्रमक

### निलम गोऱ्हे म्हणाल्या,अजितदादांसह प्रमुख नेत्यांची फारकतच



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** संघ काही करणार नाही, आणि स्वयंसेवक काहीही सोडणार नाही. संघाची ही भूमिका बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखेच आक्रमक वाटली. त्यामुळे मला मी माझ्या मातृभूमीवर आल्यासारखेच वाटले असं म्हणत विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सूचक प्रतिक्रिया देत अजितदादा सह राष्ट्रवादीचे प्रमुख नेत्यांनी संघाच्या निमंत्रणापासून हरकतच ठेवल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली.

संघ स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होत असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ींएए शी लहानपणापासून संबंध असल्याचं वक्तव्य केल्यानंतर विरोधकांकडून टोलेबाजी होत आहे. दरम्यान, आज नागपुरात संघाच्या हेडगेवार स्मृती भवन परिसरात महायुतीच्या सर्व आमदारांना निमंत्रित करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भाजप आणि शिवसेनेचे आमदार यावेळी स्मृतिभुवन परिसरात उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्याही राजू कारेमोरे आणि राजकुमार बडोले या दोनच आमदारांनी यावेळी उपस्थिती दर्शविली. मात्र अजितदादांसह राष्ट्रवादीचे सर्व प्रमुख नेते यांनी संघाच्या निमंत्रणापासून फारकतच ठेवली. असं निलम गोऱ्हे म्हणाल्या.''संघ काही करणार नाही, मात्र स्वयंसेवक काहीही सोडणार नाही''. ही संघाची भूमिका आम्हाला बाळासाहेब ठाकरे यांच्या सारखीच आक्रमक वाटली. असं सूचक वक्तव्यही त्यांनी केलं.

''संघ काही करणार नाही, आणि स्वयंसेवक काहीही सोडणार नाही'' संघाची ही भूमिका बाळासाहेब ठाकरे यांच्या सारखीच आक्रमक असून ती आम्हाला खूप आवडली.संघाच्या मार्गदर्शनानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोरे म्हणाल्या.आज नागपुरात संघाच्या हेडगेवार स्मृती भवन परिसरात महायुतीच्या सर्व आमदारांना निमंत्रित करण्यात आले होते... मोठ्या संख्येने भाजप आणि शिवसेनेचे आम दार यावेळी स्मृतिभुवन परिसरात उपस्थित होते... राष्ट्रवादी काँग्रेसच्याही राजू कारेमोरे आणि राजकुमार बडोले या दोनच आम दारांनी यावेळी उपस्थिती दर्शविली... मात्र अजितदादांसह राष्ट्रवादीचे सर्व प्रमुख नेते यांनी संघाच्या निमंत्रणापासून फारकतच ठेवली...

## राहुल गांधींविरोधात गुन्हा दाखल; संसद परिसरातला राडा भोवला, अटकेची टांगती तलवार

नवी दिल्ली : संसद परिसरात हाणामारी प्रकरणी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अडचणी वाढू शकतात. राहुल गांधी यांच्याविरुद्ध संसद मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल गांधी यांच्यावर अनेक कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आता राहुल गांधींवर अटकेची टांगती तलवार आहे. भाजप खासदाराच्या तक्रारीवरून दिल्लीतील संसद मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संसदेच्या परिसरात झालेल्या कथित हाणामारीत भाजपचे दोन खासदार प्रताप सारंगी आणि मुकेश राजपूत जखमी झाले. या दोघांना आरएमएलमध्ये दाखल करण्यात आले आहे.



यानंतर आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवार, १९ डिसेंबर रोजी राहुल गांधींसोबत झालेल्या कथित बाचाबाचीत भाजपचे दोन खासदार जखमी झाल्यामुळे संसद परिसरात एकच खळबळ उडाली होती. या हाणामारीत भाजपचे खासदार प्रताप सारंगी आणि मुकेश राजपूत जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, प्रताप सारंगी यांच्या डोक्याला दुखापत झाली असून त्यांना दोन टाके पडले आहेत. त्याचबरोबर मुकेश राजपूत यांचा बीपीचा त्रास खूप वाढला आहे.

**राहुल गांधींवर कोणती कलमं?**

कलम ११५: स्वेच्छेने दुखापत करणे
कलम ११७: गंभीर दुखापत करणे
कलम १२५: जीव आणि वैयक्तिक सुरक्षा धोक्यात आणणे
कलम १३१: गुन्हेगारी शक्तीचा वापर
कलम ३५१: गुन्हेगारी धमकी
कलम ३(५): समान हेतूसाठी कार्य करणे

सारंगी आणि मुकेश राजपूत हे सध्या डॉक्टरांच्या निरीक्षणात असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

यापूर्वी भाजप नेत्यांनी संसदेच्या आवारात धक्काबुक्की केल्याप्रकरणी संसद मार्ग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. यानंतर आता पोलिसांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या ६ कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील काही कलमं गंभीर आहेत, अशा स्थितीत राहुल गांधी यांच्या अडचणी भविष्यात वाढू शकतात.

## कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्र्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्र्वास घेतला. आज त्यांची ६८ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# आरोग्य सेवा सुलभ आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना करा

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या आरोग्य अधिकाऱ्यांना सूचना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** गोरगरीब जनतेला केंद्रबिंदू माणुन प्रत्येक व्यक्तीला उत्तमातील उत्तम आरोग्य सेवा मिळावी यादृष्टीकोनातून आरोग्य सेवा सुलभ आणि सक्षम बनविण्यासाठी उपाय योजना करण्याच्या सूचना केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना दिल्या.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अर्थसंकल्पासंदर्भात १८ डिसेंबर रोजी दिल्ली येथील आरोग्य मंत्रालयाच्या दालनात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीला आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील प्रत्येक नागरिकांना उत्तमातील उत्तम आरोग्यसेवा देण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध आहे. त्या दृष्टिकोनातून येणाऱ्या अर्थसंकल्पात आरोग्यसेवा अधिक सक्षम करून नागरिकांना सहज आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना करा अशी सुचना केली सोबत आरोग्य विषय विविध विषयावर चर्चा करण्यात आली. या बैठकीला आरोग्य विभागाची वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.






# विधानपरिषदेच्या सभापतीपदी प्रा. राम शिंदे यांची निवड

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विधानपरिषदेच्या १९ व्या सभापतीपदी प्रा. राम शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे प्रा. राम शिंदे यांना सभापतीच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेवून गेले.

विधानपरिषदेच्या सभापतीपदी विधानपरिषद सदस्य प्रा. राम शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव सदस्य श्रीकांत भारतीय, उमा खापरे व शिवाजीराव गर्जे यांनी मांडला. त्यास सदस्य मनीषा कायंदे, सदस्य अमोल मिटकरी व सदस्य ज्ञानेश्र्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रा. राम शिंदे यांचा परिचय करून दिला.

सभापती प्रा. राम शिंदे यांचा परिचय

आमदार प्रा राम शंकर शिंदे

विधानपरिषद सदस्य, माजी मंत्री

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या माहेरचे नववे वंशज.

वैयक्तिक परिचय

नाव – प्रा. राम शंकर शिंदे

जन्मतारीख – १ जानेवारी



१९६७

शिक्षण – एम. एस्सी, बी.एड. (वनस्पतिशास्त्र शरीरशास्त्र)

पत्ता – मु.पो. चौंडी, ता. जामखेड,

जि.अहिल्यानगर – ४१३२०५

भारतीय जनता पार्टीने दिलेल्या जबाबदाऱ्या आणि कार्यकाळ

– प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, महाराष्ट्र राज्य–२००४ ते २००६

– तालुकाध्यक्ष, भाजपा जामखेड तालुका–२००६ ते २००९

– जिल्हाध्यक्ष, भाजपा, अहिल्यानगर २०१० ते २०१२

– सरचिटणीस, भाजपा, महाराष्ट्र राज्य २०१३ ते २०१५

– प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा, महाराष्ट्र राज्य–२०२१

– सदस्य, भाजपा, कोअर कमिटी, महाराष्ट्र राज्य–२०२२

लोकप्रतिनिधी आणि कार्यकाळ–

– सन २०००–२००५ – सरपंच, ग्रामपंचायत चौंडी

– सन २००९–२०१४ – आमदार

२२७ कर्जत–जामखेड विधानसभा मतदारसंघातून १२,५०० मतांनी विजयी.

– २०१४–२०१९ आमदार

–२२७ कर्जत–जामखेड विधानसभा मतदारसंघातून ३८,००० मतांनी विजयी.

– सन २०१४–२०१६ या दरम्यान गृह, कृषी, आरोग्य व पर्यटन विभागाचे राज्यमंत्री म्हणून काम केले.

सन २०१६–२०१९ या दरम्यान जलसंधारण, राजशिष्टाचार, ओबीसी कल्याण, वस्त्रोद्योग व पणन या विभागाचे कॅबिनेटमंत्री म्हणून काम केले.

(सन २०१६ ते २०१९ या दरम्यान तत्कालिन मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला जलयुक्त शिवार अभियान हे जलसंधारण विभागांतर्गत प्रा.शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात राबवण्यात आले.)

# प्रिती झिंटाची कार्बन कॉपी आहे 'ही' टॅलेंटेट अभिनेत्री, डिंपलवर सगळेच फिदा!

**मुंबई/प्रतिनिधी :** आजपर्यंत असे अनेक कलाकार तुम्ही पाहिले असतील जे एकमेकांची कार्बन कॉपी वाटतात. मात्र यातील काहींची जादू इंडस्ट्रीवर चालली आणि काही सपशेल फेल ठरले. अशातच आता आणखी दोन अभिनेत्रींची तुलना सोशल मीडियावर सुरु आहे. अभिनेत्री प्रिती झिंटाची कार्बन कॉपी असलेली अभिनेत्री सध्या लोकांचं लक्ष वेधून घेत आहे. दोघींनाही डिंपल्स पडतात आणि दोघीही सारख्याच दिसतात असं नेटकरी म्हणत आहेत.

बॉलिवूड अभिनेत्री प्रीती झिंटाने आपल्या सौंदर्याने आपल्या चाहत्यांना नेहमीच खिळवून ठेवलं आहे. तिने तिच्या कारकिर्दीत तिन्ही खानसोबत काम केलं आहे. शाहरुख खानच्या 'दिल' या चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. पाकिस्तानची एक अभिनेत्री हुबेहुब तिच्यासारखी दिसतेय अशी चर्चा रंगली आहे.

प्रीती झिंटाने तिच्या पदार्पणाच्या चित्रपटातूनच इंडस्ट्रीत आपला ठसा उमटवला. या चित्रपटासाठी तिला फिमेल डेब्यू अवॉर्डही मिळाला होता. प्रीती आज अभिनयाच्या जगात तितकीशी सक्रिय नसली तरीही ती चाहत्यांची आवडती आहे. विशेषत: प्रिती झिंटा तिच्या डिंपल्ससाठी खूप लोकप्रिय आहे. लोक तिच्या हसण्यावर फिदा आहेत. पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमिर देखील डिंपल क्वीन आहे. तिने आपल्या सौंदर्याने पाकिस्तानी इंडस्ट्रीत खळबळ उडवून दिली आहे.

पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमिरलाही कोणत्याही ओळखीची गरज नाही. तिने आपल्या करिअरमध्ये अनेक टीव्ही शो केले आहेत. मेकअपशिवायही ती सुंदर दिसते. या अभिनेत्रीचे पाकिस्तानातही खूप चाहते आहेत.










DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### इंदीरानगर परिसरातील अपात्र लाभार्थ्यांना बीएसयूपी योजनेत घरे मिळण्यासाठी उपोषण




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** कल्याण पश्र्चिमेतील इंदीरानगर परिसरात राहणाऱ्या १०५ अपात्र लाभार्थ्यांना बीएसयूपी योजनेत घरे देण्यात यावी यासाठी इंदिरानगर एकता विकास संघाच्या वतीने नागरीकांचे उपोषण सुरु आहे. जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही तोपर्यंत हे उपोषण सुरु राहणार असल्याचा निर्णय आंदोलकांनी घेतले आहे. या प्रसंगी उपोषणकर्त्यांनी उपायुक्त रमेश मिसाळ यांची भेट घेतली. उपायुक्त रमेश मिसाळ यांनी योग्य ती कार्यवाही केली जाईल असे सांगितले आहे.

### शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हापरिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने जिल्हापरिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वानाच जुनी पेन्शन योजना लागू करावी, एक नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक शिकेत्तर कर्मचारी इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही करण्यात यावी यावी, प्रलंबित ३ टक्के महागाई भत्ता वाढ देण्यात यावी, राज्यातील शिक्षकांचे सुमारे ६५००० रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत यासह विविध मागण्यांसाठी आज धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

### आमदार राजकुमार बडोले यांनी घेतली सोमनाथ सूर्यवंशी याच्या कुटुंबाची भेट



दैनिक आपला विदर्भ

**परभणी /प्रतिनिधी :** परभणीची घटना ही अत्यंत दुर्दैवा असून या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी हे कोंबिंग ऑपरेशन राबवले त्याच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. पोलीस यंत्रणेच्या चुकीमुळे सदरील दुर्दैवी प्रकार घडला आहे. सोमनाथ सूर्यवंशी च्या मृत्यूला पोलीस यंत्रणा जबाबदार आहे. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू मारहाणी मुळे झाला आहे त्यामुळे पोलिसांवर कारवाई झाली पाहिजे, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांचे आदेश नसताना स्थानिक गुन्हे शाखेचा पोलीस निरीक्षक कसं काय कारवाई करू शकतो? सोमनाथ सूर्यवंशी याच्या कुटुंबाला ५० लाख रुपये दिले पाहिजे सदोष मनुष्य बाळाचा गुन्हा पोलिसांवर दाखल झाला पाहिजे. संविधानाचा अपमान करणाऱ्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भेटून या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे अशी मागणी करणार आहे. उद्या मुख्यमंत्री याबाबत आपले निवेदन मांडतील अशी प्रतिक्रिया आमदार राजकुमारबडोले यांनी दिली आहे.

### संजय गांधी निराधार व अन्य योजनेतील लाभार्थ्यांनी बँकेशी आधार संलग्न करावे

**नांदेड/प्रतिनिधी :** विशेष सहाय योजनेतील अर्थात संजय गांधी निराधार योजना व अन्य योजनातील जिल्ह्यामधील मंजूर २ हजार १२५ लाभार्थ्यांनी अद्यापही आपले बँक खाते आधारशी संलग्न करून घेतले नाही. अशा निराधार लाभार्थ्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी. यासंदर्भातील अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. त्यामुळे तातडीने बँकेशी आधार संलग्न करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने आवाहन केले आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना आदी योजनेमधील पात्र लाभार्थ्यांना बँक किंवा पोस्ट खाते आधार क्रमांकाशी संलग्न अर्थात जोडल्या गेल्यानंतरच अर्थसहाय्याचे वाटप केले जाते. हा शासन निर्णय आहे. जिल्ह्यामध्ये या योजनेसाठी २ हजार १२५ लाभार्थी नव्याने पात्र ठरले असून या नव्या लाभार्थ्यांनी आपले बँक खाते आधार खात्याशी संलग्न केले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे समाजसेवकांना, नातेवाईकांना आवाहन करण्यात येते की अशा लाभार्थ्यांची मदत करावी. त्यांना सेतू केंद्र व बँक येथे पोहोचवून त्यांचे खाते आधार कार्डशी जोडून घ्यावे, यासंदर्भातील अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी तातडीने ही कार्यवाही पूर्ण करण्याचे आवाहन संजय गांधी निराधार योजनेचे नांदेड शहराचे तहसिलदारांनी केले आहे.

# तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर /प्रतिनिधी :** महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचे राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. मागील अडीच वर्षात महाराष्ट्राच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचं एकत्रित मिशन आहे समृध्द महाराष्ट्राचं. आता आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ. महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, मागील अडीच वर्षात महायुतीने विकास आणि कल्याणकारी योजनांचं ऐतिहासिक काम केले. मागील अडीच वर्षात विक्रमी कामे झाली. एकही दिवस सुटी न घेता आम्ही काम केलं. त्यामुळे या राज्याच्या निवडणूक निकालांत इतिहास घडला.

मागील अडीच वर्ष आम्ही एक टीम म्हणून काम केले. त्यामुळेच आमचे सरकार हे जनतेचे लाडकं सरकार झाले. जनतेच्या विश्र्वासामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आता अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचं वचन आम्ही देतोय. मुख्यमंत्री म्हणून काम करताना माझे धोरण गतिमान विकास हेच होते तिथे पक्षभेद, द्वेषाला कधी थारा दिला नाही.

मागील अडीच वर्षात महायुती सरकारच्या विकासकामांचा स्ट्राईक रेट देशात सर्वाधिक होता. यापुढे हा स्ट्राईक रेट वाढतच राहणार आहे. महाराष्ट्राला देशात क्रमांक एकचे राज्य बनविण्यासाठी आम्ही सगळे दिवस-रात्र चोवीस तास काम करत होतोच यापुढेही करू अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

मागील अडीच वर्षात ज्या लोककल्याणकारी योजना राबवल्या. विक्रमी विकासकामे झाली. परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र पहिला आहे, महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र पहिला आहे, जीएसटीत पहिले आहोत, उद्योगांमध्ये पहिला क्रमांक, पाच लाखांचा आरोग्य विमा देणारे पहिले राज्य, शेतकऱ्यांना मोफत वीज देणारे पहिले राज्य, १० लाख तरुणांना स्टायपेंड देणारे पहिले राज्य, देशातला सर्वाधिक लांबीचा सागरीसेतू करणारे पहिले राज्य आणि सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क असलेले राज्य, अशी महाराष्ट्राची देशभरात ओळख झाल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात १० लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामं सुरु आहेत. महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. मुंबई, एमएमआर, पुणे, नाशिक आणि नागपूर शहरांत साडेचारशे किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्ग सुरु करणार आहोत. शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या नवीन ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्गाला मंजुरी दिली आहे. पुणे रिंग रोड, अलिबाग-विरार मल्टीमोडल कॉरिडोर ही कामे वेगाने सुरु आहेत. सात हजार किमी ॲक्सेस कंट्रोल रस्ते आपण तयार करत आहेत. राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी सात ते आठ तासांपेक्षा जास्त वेळ लागता कामा नये असे आमचे नियोजन असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला महासत्ता करण्याचा रोडमॅप आखलेला आहे. त्या दिशेनेच काम करून राज्याला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकावरचे राज्य करायचे आहे. विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. प्रधानमंत्र्यांसह गृहमंत्री अमित शाह यांचे भक्कम पाठबळ आहे आणि यापुढेही राहिल याची मला खात्री आहे. आता आमचे एकत्रित मिशन आहे समृध्द महाराष्ट्राचे. आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

### विदर्भ विकासासाठी ठोस पावले

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, माझे विदर्भाशी माझे वेगळे नाते आहे ते इथल्या प्रेम करणाऱ्या जनतेमुळे. मुख्यमंत्री असतांना मलाही विदर्भासाठी काहीतरी भरीव करण्याची संधी मिळाली याचा निश्र्चितच आनंद आहे. मागील दोन्हीही अधिवेशनात आम्ही विदर्भाच्या विकासासाठी ठोस पाऊलं उचलली आहेत आणि त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. समृध्दी महामार्ग आपण गोंदिया, भंडारा, गडचिरोलीपर्यंत पुढे नेत आहोत. विदर्भातल्या ५ लाख शेतकऱ्यांना धान उत्पादनासाठी हेक्टरी १५ हजार रुपये बोनसची घोषणा मुख्यमंत्री म्हणून पहिल्याच अधिवेशनात मी केली होती. या बोनसची रक्कम आम्ही २० हजार केली आहे. विदर्भ लॉजिस्टिक हब म्हणून विकसित करायचा आहे.

विदर्भ, मराठवाडामधील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी ७० हजार कोटींच्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे. सुरजागड येथे दोन नवीन प्रकल्प माझ्या कार्यकाळात सुरू झाले. मागील अडीच वर्षात आम्ही ८६ कॅबिनेट बैठका घेतल्या आणि ८५० महत्त्वाचे निर्णय घेतले. छोटे मोठे निर्णय सांगायला बसले तर एक अधिवेशन कमी पडेल, असेही ते म्हणाले.

### एकाही पात्र बहिणीच्या खात्यात जाणारे पैसे बंद होणार नाही

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत २ कोटी ३४ लाख लाडक्या बहिणींना पाच हप्ते आम्ही दिले. यापुढेही ते मिळत राहतील. आत्ताच्या पुरवणी मागण्यात १४०० कोटींची तरतूदही केली आहे. माझ्या एकाही पात्र लाडक्या बहिणीच्या खात्यात जाणारे पैसे बंद होणार नाही. हा त्यांच्या लाडक्या भावाचा शब्द आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना सुरु केली. ८९ लाख कुटुंबांना वर्षातून तीन सिलेंडर मोफत देत आहोत. मुख्यमंत्री लेक लाडकी योजनेत ३४ हजार जणांना लाभ दिला आहे. साडे तीन लाखापेक्षा जास्त मुलींनी मोफत व्यावसायिक शिक्षण योजनेचा लाभ घेतलाय. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ सव्वा लाख लाडक्या भावांना झालाय. ज्येष्ठांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू केली असून १२३ कोटींचे अनुदान वाटप केले त्याचा सव्वा चार लाख ज्येष्ठांना लाभ झाला आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु केली. आत्तापर्यंत विशेष रेल्वेने मुंबई, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूरहून आणि इतर ९ शहरांतून तीर्थयात्रा सुरु झाली आहे. ६ हजारपेक्षा जास्त ज्येष्ठांनी त्याचा लाभ घेतला आहे. एसटीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आहे. खेड्यापाड्यातले लाखो लोक याचा फायदा घेत आहेत.

# पारंपारिक पीक पद्धतीला फाटा देत शेतकऱ्याने केली टरबुजाची लागवड



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव /प्रतिनिधी :** शेतकरी राजा नेहमीच आपल्या पारंपारिक शेती तून उत्पन्न घेत असतो त्यामुळे पारंपारिक शेतीने शेतकरी कर्जबाजारी होत असतो कारण पारंपारिक शेती पिकाला योग्य तो हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी राजा ने खर्च केलेला पैसा देखील निघत नाही. परिणामी शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती न करता काहीतरी वेगळे करण्याचा प्रयत्न केल्यास नक्कीच यश मिळेल यात शंका नाही पारंपारिक पीक पद्धतीला फाटा देत पाचोरा तालुक्यातील खडकदेवळा येथील शेतकरी वसंत सुपडू पाटील यांनी आपल्या शेतात सुमारे दीड एकर शेत जमिनी टरबूजची लागवड करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पारंपारिक पीक पद्धतीत बदल करण्याचा त्यांनी निर्णय घेतला नुसता निर्णय न घेता तो अमलातही आणला आणि तयारीला लागले. शेत जमीन तयार करून त्यांनी टरबूज लागवडीसाठी शेतामध्ये ठिबक सिंचनासह मल्चिंग पेपर आथरण्याचे काम हाती घेऊन लवकरच ते टरबुजाची लागवड करणार आहेत. त्यामुळे पारंपारिक पीक पद्धत मध्ये बदल करून त्यांनी केलेली पिक पद्धतीत बदल नक्कीच त्यांना यश मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### माळेगाव यात्रेमध्ये डॉ.शंकरराव चव्हाण कृषि प्रदर्शन व कृषिनिष्ठ शेतकरी पुरस्कार वितरण समारंभ होणार

**स्टॉल नोंदणीची आजची शेवटची तारीख**

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह मराठवाड्यात महत्त्वपूर्ण असणाऱ्या श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेदरम्यान दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत डॉ. शंकरराव चव्हाण भव्य कृषि प्रदर्शन व डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ पुरस्काराचे, शेतकरी पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती कृषि विभागाने दिली आहे. यामध्ये मोठ्यासंख्येने शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. तसेच स्टॉल नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

२९ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या खंडोरायाच्या यात्रेनिमित्त कृषिप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रदर्शनात जिल्ह्यातील फळे, मसाला पिके, भाजीपाला उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील फळे, भाजीपाला व मसाला पिकाचे उत्कृष्ट नमुने आणून ठेवावे, प्रदर्शनात ठेवलेल्या फळे, मसाला पिके व भाजीपाल्याच्या नमुन्यास प्रत्येक वाणातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात येणार आहे. विजेत्या शेतकऱ्यांना ४ हजार, ३ हजार व २ हजार बक्षिस देण्यात येणार आहे. यासाठी ८० स्टॉल्सचे नियोजन केले आहे. यामध्ये बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, औषधे, ट्रॅक्टर निर्माण, औजारे उत्पादन तसेच महिला बचतगटाचे आरोग्य विभागाचे, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञानकेंद्र, महाबिज, खादीग्रामोद्योग अशा विविध स्टॉल्सचा समावेश असेल. ज्यांना प्रदर्शनादरम्यान आपला स्टॉल्स उभारावयाचा आहे त्यांनी कृषि विभाग जिल्हा परिषद नांदेड येथे २० डिसेंबर पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन कृषि विकास अधिकारी माने यांनी केले आहे.

# उत्तर कर्नाटकावर चर्चा होत मुंबईला केंद्रशासित करण्याची मागणी

## काँग्रेस आमदाराने अकलेचे तारे तोडले

बेळगाव : बेळगावात सुरू असलेल्या कर्नाटक विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये आज बुधवारी उत्तर कर्नाटकावर चर्चा होत असताना अथणी येथील काँग्रेसच्या आमदारांनी मुंबईला केंद्रशासित करण्याची मागणी करून आपल्या अकलेचे तारे तोडले. बेळगाव येथील सुवर्ण विधानसभेत येथे कर्नाटक विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असून या अधिवेशनाच्या उत्तरार्धात उत्तर कर्नाटकातील समस्या आणि विकासावर चर्चा सुरू आहे. त्यानुसार आज सभागृहामध्ये चर्चेला प्रारंभ झाल्यानंतर अथणीचे आमदार लक्ष्मण सवदी यांनी महाराष्ट्रातील नेते बेळगावसह सीमाभाग केंद्रशासित करावा अशी मागणी करत असतील तर आपण देखील मुंबईला केंद्रशासित करण्याची मागणी केली पाहिजे असे वक्तव्य करून आपल्या अकलेच्या तारे तोडले.

मुंबई देखील केंद्रशासित करावी अशी मागणी आपण केली पाहिजे

आमदार सवदी म्हणाले परवा महाराष्ट्रातील बुद्धिभ्रष्ट झालेल्या एका नेत्याने बेळगावसह सीमाभाग केंद्रशासित करावा असे वक्तव्य केले. यासंदर्भात प्रसिद्धी माध्यमांनी आम्हाला चर्चेसाठी बोलावून प्रश्न विचारला असता संबंधित नेत्याची मती भ्रष्ट झाल्याचे मी स्पष्टपणे सांगितले. या पद्धतीने जर कर्नाटकाचा अविभाज्य अंग असलेला बेळगाव सीमाभाग केंद्रशासित करायचा असेल तर मुंबई देखील केंद्रशासित करावी अशी मागणी आपण केली पाहिजे. कारण आमचे पूर्व मुंबईत वास्तव्यास होते. त्यामुळे आमचा मुंबईवर अधिकार आहे असे आपण म्हणू शकतो. कारण पूर्वी बेळगावसह अन्य सहा जिल्हे मुंबई प्रांताचा भाग असताना आमचे कर्नाटकातील लोक मुंबईला जात होते. त्या ठिकाणी वास्तव्यास होते आणि ही बाब लक्षात घेता आमचा मुंबईवर हक्क आहे. त्यामुळे प्रथम मुंबई केंद्रशासित केली जावी आणि तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा, असे वक्तव्य करून आमदार लक्ष्मण सवदी यांनी आज स्वत:च्याच मती भ्रष्टतेची जणू प्रचिती दिली. एवढे बोलून न थांबता आमदार सवदी यांनी महाराष्ट्राला बेळगाव हवे असेल तर ते त्यांना द्या आणि त्या बदल्यात आमच्या पूर्वजांनी राज्य केलेले मुंबई कर्नाटकाला घ्या असा अजब सल्लाही दिला.

दरम्यान, बेळगाव-महाराष्ट्रातील नेते बेळगावला केंद्रशासित करण्याची मागणी सातत्याने करत असतात. या उलट बेळगाव सीमाभागाचा मुंबईवर हक्क आहे. त्यामुळे मुंबईला केंद्रशासित करण्यात यावे, असा प्रस्ताव कर्नाटक शासनाने केंद्र सरकारकडे पाठवावा अशा अथणीचे आमदार लक्ष्मण सवदी यांनी आज विधानसभेत केलेल्या अजब मागणीची पडसाद नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे.

आपल्या भागात अलमट्टी धरणातून पाणी सिंचन झाले पाहिजे

सभागृहात उत्तर कर्नाटकावर झालेल्या चर्चेप्रसंगी आमदार बसवराज पाटील -यत्नाळ यांनी अलमट्टी धरणाच्या पाणी सिंचनाचा मुद्दा उपस्थित केला. आपल्या भागात अलमट्टी धरणातून पाणी सिंचन झाले पाहिजे तसे झाले तरच आमचा जगू शेतकरी जगू शकेल, असे नमूद केले. त्याचप्रमाणे रोजगार निर्मिती, शिक्षण आणि परिवहन याबाबतीतील समस्या सोडवाव्यात अशी मागणी त्यांनी केली. बेळगावला कोट्यावधी रुपये खर्च करून सुवर्ण विधानसौधची इमारत उभारण्यात आली असली तरी अधिवेशनाचा काळ वगळता वर्षभर ही इमारत ओस मोकळी पडून असते. अधिवेशनासाठी दरवर्षी जवळपास २५ कोटी रुपये खर्च केले जातात तितकाच खर्च सुवर्णसौधच्या देखभालीसाठी होत असतो. हे लक्षात घेऊन या ठिकाणी राज्य पातळीवरील सरकारी कार्यालय स्थापन केली जावीत असे मग काही आमदारांनी व्यक्त केले. बेळगाव जिल्हास्तरीय कार्यालय या ठिकाणी स्थलांतरित करून काय फायदा होणार? असा सवालही त्या आमदारांनी केला. याखेरीज बेळगाव शहरातील उदयोन्मुख होतकरू खेळाडूंवर राज्यस्तरावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जावी त्यांच्यासाठी आधुनिक क्रीडा सुविधा आणि क्रीडांगण उपलब्ध करून दिली जावी अशी मागणी देखील काही आमदारांनी केली. कल्याण कर्नाटकासाठी जसे प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे तसेच बेळगावचा अंतर्भाव असलेल्या कित्तूर कर्नाटकासाठी स्वतंत्र प्राधिकरण नेमून दरवर्षी किमान १००० कोटी रुपयांचे अनुदान दिले जावे, अशी मागणी बहुतांश आमदारांनी केली.



# बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांना स्वयंरोजगाराचे धडे: बंद्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कारागृहातुन मुक्त झाल्यानंतर त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे, या उद्देशाने बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता स्वयंरोजगाराचे धडे देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने येथील सेंट ग्रामिण प्रशिक्षण संस्थाच्या माध्यमातुन दि. १६ डिसेंबरपासुन सहा दिवसांचे फास्ट फुड उद्यमी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाला बंद्यांचा उत्स्फुर्त प्रतिसादपणे सहभागी नोंदविला.

बुलढाणा जिल्हा कारागृहामध्ये ३२३ न्यायाधिन बंदी बंदीस्त आहे. या बदीस्त बंद्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून पहिल्या तुकडीमध्ये ३२ बंद्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला आहे. कोल्हापुर येथील प्रशिक्षक तृप्ती धिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण सुरु झालेले आहे. सदर



प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी बंद्यांना संस्थेमार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच बंद्यांना भविष्यात उपजिवीकेसाठी निश्र्चितच फायदा होणार आहे. सेंट ग्रामीण प्रशिक्षण संस्था बुलढाणा यांचे मार्फत कारागृहामध्ये बंद्यांकरीता पुढील प्रशिक्षण शिबिरामध्ये नर्सिंग कोर्स, टेलरींग कोर्स, मोटार रिवायडींग असे विविध प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहेत.

या उपक्रमामध्ये अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक प्रशांत बुरडे, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य पुणे व विशेष पोलीस महानिरीक्षक(मुख्यालय) जालिंदर सुपेकर, कारागृह व सुधारसेवा व कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात





आले. सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाकरीता कारागृह अधीक्षक संदीप पां. भुतेकर, वरीष्ठ तुरंगाधिकारी मेघा बाहेकर, सेंट ग्रामीण प्रशिक्षण संस्थाचे संचालक संदीप पोटे, फॅकल्टी स्वनील गवई, श्रीकृष्ण राजगुरे, सहाय्यक प्रशांत उबरहांडे, मनिषा देव तसेच सर्व कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## मंत्री संजय राठोड यांना जिल्ह्याचे पालकमंत्री पद देऊ नये यासाठी शिवसेना कार्यकर्त्यांचे आंदोलन






दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळ विस्तारात पुन्हा एकदा संजय राठोड यांना स्थान दिल्याने वाशिममधील शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. आज पाटणी चौकात शेकडो शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते. यावेळी वाशिममधील शिवसैनिकांनी खासदार भावना गवळी यांना मंत्रिमंडळात संधी देण्याची जोरदार मागणी केली. महिला अत्याचार व भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये अडकलेल्या संजय राठोड यांना वाशिमचे पालकमंत्री करू नये, अशी कार्यकर्त्यांची ठाम भूमिका आहे. भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने मंत्रिमंडळात महिलांना स्थान दिले, मात्र शिवसेनेत एकाही महिलेला संधी न दिल्याचा संताप कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. वाशिम शहरातील पाटणी चौकात हे आंदोलन करण्यात आले.

## राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण अंतर्गत बाजारासाठी जागा उपलब्ध करण्यात येणार

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** *राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत सणासुदीच्या काळामध्ये महिला स्वयंसहायता बचतगटांना जिल्ह्याच्या ठिकाणी बाजारासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत आज आढावा बैठक घेण्यात आली. यासंदर्भातील धोरण निश्र्चित करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिली.*


*जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी यांच्या समावेश असणारी समिती यासंदर्भात गठीत करण्यात आली आहे. या समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती.*

*नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त गंगाधर इरलोड यांनी यासंदर्भात आज विविध अधिकाऱ्यांना माहिती दिली. समितीला बाजारासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत नेमकी कोणती कार्यवाही करायची याबाबतची माहिती दिली. यावेळी जागा उपलब्धतेच्या बाबत चर्चा झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात कोणत्याही यंत्रणेची अडचण असल्यास तातडीने लक्षात आणून द्यावेत. यासंदर्भातील शासन निर्णयातील नियमांचे पालन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.*

## भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिवसाला सुशासन दिन साजरा करा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस २५ डिसेंबर हा सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. दरवर्षी २५ डिसेंबर या दिवशी सार्वजनिक सुट्टी असली तरी त्या दिवशी माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपाचे आयुक्त, पोलीस अधिक्षक व जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांना निर्देश देण्यात आले आहेत. हा दिवस सुशासन दिन म्हणून पाळण्यात यावा. तसेच १९ ते २५ डिसेंबर या काळामध्ये वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन करून नागरिकांना योजनांचा लाभ देण्यात यावा.

जिल्हा प्रमुख व अधिनस्त कार्यालयांनी या सुशासन दिनाच्या निमित्ताने सेवा प्रशासनास उपयुक्त अशा बाबीसंदर्भात विविध उपक्रम राबविण्यात यावेत. जसे माहितीचा अधिकार प्रशिक्षण, प्रशासनातील उत्कृष्ट संकल्पनांचे सादरीकरण, सेवाविषयक प्रशिक्षण इ., तणाव मुक्ती व्यवस्थापन, सेवा हमी कायद्याची अंमलबजाणी, असे निर्देश जिल्हाधिकारी नांदेड यांनी दिले आहेत.


## जिल्ह्यात 'प्रशासन गाँव की ओर' मोहीमेला सुरुवात; कोथळी व खराबडी येथील अपंग लाभार्थ्यांना दिली सेवा





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहेत. या सप्ताहांतर्गत जिल्ह्यात 'प्रशासन गाँव की ओर' मोहीमेला गुरुवार दि. १९ डिसेंबर पासून सुरुवात झाली आहे. मोहिमेंतर्गत मौजे कोथळी व खराबडी येथे अपंग लाभार्थ्यांच्या घरी जाऊन शासकीय योजनाच्या लाभाचे प्रस्ताव तयार करुन घेण्यात आले. तसेच यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनाची माहिती दिली.



या 'सुशासन सप्ताह–प्रशासन गाँव की ओर' मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करुन विविध सेवांचा लाभ दिला जाणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या तक्रारीं, अर्जांचा निपटारा करुन सेवांचा लाभ दिला जाणार आहे.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये विविध उपक्रमाचे आयोजन; विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** चिखली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्कुल कनेक्ट वीक, तंत्रप्रदर्शनी, व अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

९ ते १३ डिसेंबर दरम्यान 'स्कुल कनेक्ट वीक' साजरा

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे दि.९ ते १३ डिसेंबर २०२४ दरम्यान स्कुल कनेक्ट वीक म्हणून




साजरा करण्यात आला. या सप्ता मध्ये चिखली तालुक्यामधील तब्बल ८३ विविध शाळाना प्रत्यक्ष भेटी देऊन विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध व्यवसाय अभ्यासक्रम, त्यांची उपयुक्ता, रोजगार स्वयंरोजगारची संधी याबाबतची माहिती देण्यात आली. भविष्यात तांत्रिक व्यवसाय मध्ये शिक्षण घेतल्यानंतर तांत्रिक माहितीचा उपयोग कसा होतो याबाबतचे महत्व पटवून देण्यात आले.

### तंत्रप्रदर्शनीला प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखली येथे दि.१८ डिसेंबर रोजी तंत्रप्रदर्शनी आयोजित करण्यात आले. या तंत्रप्रदर्शनी मध्ये विविध व्यवसायातील प्रशिक्षणार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या तंत्रप्रदर्शनीव्दारे त्यांच्यातील सुप्त गुणाला वाव मिळावा म्हणून विविध शाळेमधील विद्यार्थ्यांना निमंत्रित करुन त्यांना प्रदर्शनीमध्ये तयार करण्यात आलेले विविध प्रकल्प दाखवून त्याबाबतची माहिती देण्यात आली. सदर प्रदर्शनीमध्ये संस्थेतील प्रशिक्षणार्थीनी मोठ्या उत्साहाने भाग घेऊन आपल्या मधील सुप्त गुणांचे प्रदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी संस्थेतील प्राचार्य शिल्प निदेशक व कर्मचारी वृंद यांनी योग्य मार्गदर्शन करुन सहकार्य केले.

### अल्पसंख्यांक हक्क दिवस उत्सहात साजरा

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखली येथे दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी अल्पसंख्यांक हक्क दिवस उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेतील अध्यक्ष व प्राचार्य पी. एन. देशमुख आणि शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थित होते. तसेच शिल्प निदेशक एम. व्ही. सोनूने यांनी अल्प संख्याकाचे घटनात्मक अधिकार आणि कायदेशीर हक्का बाबतचे महत्व प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन केले.

## विविध वृत्त...

### अकोल्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या वक्तव्या विरोधात वंचितचे ठिय्या आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्या विरोधात अकोल्यात वंचित बहुजन आघाडीने जोरदार निदर्शने करत रस्त्यावर बसून ठिय्या आंदोलन केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विरोधात वंचितच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली आहे. अकोल्यातील जिल्ह्याधिकारी कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात आले.

### अकोल्यातील अशोक वाटिका चौकात ब्रेक फेल झाल्याने शिवशाही बसचा अपघात



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात शिवशाही बसचा अपघात झाला आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूरवरून अकोल्याला येणाऱ्या शिवशाही बसचे ब्रेक निकामी झाले आणि यामुळे हा अपघात झाला. बस चालक मनोज तायडे यांच्या समयसूचकतेमुळे मोठी दुर्घटना टळली आहे. ब्रेक निकामी झाल्यानंतर चालकाने बस बंद पडलेल्या पेट्रोल पंपात घुसवल्याने मोठा अनर्थ टळला आहे. अकोल्यातील अशोक वाटिका चौकात ही घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जिवीतहानी झालेली नाही.


### बीड हत्या प्रकरणातील मुख्य आरोपींना अटक करण्यासाठी मेहकरमध्ये मराठा समाजाची निदर्शने



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बीड मधील मस्साजोग गावचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ बुलढाण्यातील मेहकर मध्ये मराठा समाजाकडून निदर्शने करण्यात आली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची कसून चौकशी करून मुख्य आरोपींना अटक करावी या मागणीसाठी बुलढाण्यातील मेहकर मध्ये मराठा समाजाकडून निदर्शने करण्यात आली.

### सारंगखेडाच्या घोडेबाजारात अवघ्या पाच दिवसात दीड कोटीची उलाढाल




दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** सारंगखेडाची यात्रा ही घोडेबाजारासाठी संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. घोडे पाहण्यासाठी व खरेदी करण्यासाठी येथे अश्र्व शौकीन मोठ्या संख्येने दाखल होत असतात. सारंगखेडा यात्रेला सुरू होऊन अवघे पाच दिवस झाले असून पाच दिवसात दीड कोटीची उलाढाल अश्र्व बाजारात झाली आहे. आतापर्यंत २४०० ते २६०० घोडे सारंगखेडा यात्रेत दाखल झाले असून जवळपास ३५० घोड्यांच्या विक्रीतून दीड कोटींची उलाढाल सारंगखेडा यात्रेत झाली आहे. यात्रा सुरू झाल्यानंतर घोडे येत नसतात परंतु यावर्षी यात्रा सुरू झाल्यानंतरही घोड्यांचे येणे सुरू असून मोठी उलाढाल होण्याची शक्यता आहे. जवळपास अजून १० दिवस यात्रा असून या ८ ते १० दिवसात पाच कोटीची उलाढाल होण्याची शक्यता चेतक फेस्टिवलचे प्रमुख जयपाल सिंग रावल यांनी वर्तवली आहे. सारंगखेडा यात्रा घोड्यांसाठीच प्रसिद्ध असल्याने दरवर्षी येथे घोडे विक्रीतून करोडोची उलाढाल होत असते.